**ठळक बातम्या**

- महाराष्ट्राच्या आगामी आर्थिक वर्षासाठीच्या अर्थसंकल्पात कृषी, रस्ते, पर्यटन आदि क्षेत्रांसाठी विविध योजना, शेतकऱ्यांना २ लाखापर्यंत कर्जमाफी / महसुली तूट ४० हजार ५५२ कोटी रुपये राहण्याचा अंदाज

- शेती हा देशाच्या विकासाच्या दीर्घकालीन प्रवासासाठी एक धोरणात्मक आधारस्तंभ असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- इराणची बहुतेक सर्व हवाई संरक्षण प्रणाली आणि क्षेपणास्त्र प्रक्षेपक नष्ट केल्याचा इस्रायलचा दावा, तर तेहरानवरचे  हल्ले आणखी तीव्र करण्याचा अमेरिकेचा इशारा

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये १ हजार ९७ अंकांची घसरण

**<><><><><>**

महाराष्ट्राला २०४७ पर्यंत विकसित करण्याचं उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून तयार केलेला अर्थसंकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत सादर केला. यंदाचा अर्थसंकल्प हा आगामी वर्षाचा जमाखर्च नसून विकसित महाराष्ट्र २०४७ कडे जाणाऱ्या प्रवासाचा महत्त्वाचा टप्पा असल्याचं त्यांनी सांगितलं. यावेळी कृषी, रस्ते विकास, पर्यटन यासारख्या क्षेत्रासाठी त्यांनी आज विविध योजनांची घोषणा केली.

३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत कर्ज असणाऱ्या शेतकऱ्यांना २ लाखापर्यंत कर्जमाफी देणारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना मुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पात जाहीर केली. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत लाभ सरकार देणार आहे. २०४७ पर्यंत कृषी क्षेत्राचा जीडीपी ५५ अब्जवरून ५०० अब्ज डॉलरपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट राज्य सरकारनं ठेवलं आहे. कृषी क्षेत्रासाठीच्या विविध योजनांविषयी ते म्हणाले…

**-   - होल्ड - मुख्यमंत्री कृषी - -**

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक, मुख्यमंत्री मत्स्य संपदा योजनेची घोषणाही त्यांनी या अर्थसंकल्पात केली. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या तिसऱ्या टप्प्यात २३ हजार

किलोमीटर रस्ते केले जाणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. याशिवाय महाराष्ट्र अमृतकाळ रस्ते विकास योजनेची घोषणा त्यांनी केली. याअंतर्गत ६ हजार किलोमीटरहून अधिक लांबीचे दृतगती मार्ग, सुमारे १५ हजार किलोमिटर लांबीचे राज्य आणि जिल्हा मार्ग तसंच पर्यटन स्थळांना जोडणारे ४ हजार किलोमीटरहून अधिक लांबीचे रस्ते उभारणार असल्याचं फडनवीस म्हणाले. मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद योजनेची घोषणाही त्यांनी केली. आकांक्षित जिल्हा आणि तालुका योजनेचा विस्तार करुन, त्यात हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे आणि परभणी या जिल्ह्यांचा समावेश राज्य सरकारनं केला आहे.

येत्या आर्थिक वर्षात अनुसूचित जाती घटकांसाठी २३ हजार कोटी रुपयांहून अधिक तर आदिवासींसाठी पावणे २२ हजार कोटींची तरतूद आहे. कातकरी, कोलम, माडिया तसंच पारधी यांच्यासाठी विशेष पॅकेजद्वारे निधी राखीव ठेवण्याचा मानस राज्य सरकारनं व्यक्त केला आहे.

२०२६-२७ हे सामाजिक समता आणि समरसता वर्ष असेल, असं अर्थसंकल्पात म्हटलं आहे. महात्मा ज्योतिबा फुले आणि संत गाडगेबाबा यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी विविध उपक्रमांची घोषणा मुख्यमंत्र्यांनी आज अर्थसंकल्पात केली.

बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विविध योजना सरकार जाहीर करणार आहे. अजित पवार यांचं भव्य स्मारक उभारण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी आज केली.

प्रत्येक जिल्ह्यात प्रत्येक जिल्ह्यात MSME केंद्र स्थापन केलं जाणार असून MSME आणि सेवा क्षेत्रासाठी आयुक्तालयाची घोषणा मुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पात केली. राज्यात नवउपक्रम शहरांची उभारणी करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. राज्यातल्या परदेशी पर्यटकांची संख्या वाढवण्यासाठी मुंबई, सिंगापूर आणि दुबईत विशेष केंद्र स्थापन केली जाणार आहेत.

**<><><><><>**

एकूण ७ लाख ६९ हजार ४६७ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प देवेंद्र फडनवीस यांनी आज सादर केला. गेल्यावर्षीचा अर्थसंकल्प सुमारे ७ लाख ५६ कोटी रुपयांचा होता. यंदाच्या अर्थसंकल्पात ६ लाख १६ हजार कोटी रुपयांहून अधिक महसुली जमा आणि ६ लाख ५६ हजारांहून अधिक महसुली खर्च अपेक्षित आहे. येत्या आर्थिक वर्षात राज्याची

महसुली तूट ४० हजार ५५२ कोटी रुपये असेल. तर राजकोषीय तूट दीड लाख कोटींच्या वर जाईल, असा सरकारचा अंदाज आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीत शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचं आश्वासन, अर्थसंकल्पात तरतूद करून सरकारनं पूर्ण केलं असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी विधिमंडळ परिसरात वार्ताहर परिषदेत बोलताना केलं. प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक आणि सुशासन या चार स्तंभावर आधारित आजचा अर्थसंकल्प असल्याचं ते म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवारही यावेळी उपस्थित होत्या.

रस्ते, मेट्रो, जलमार्ग यांचं जाळं राज्यात उभारलं जात असून ग्रामीण आणि शहरी भागाच्या विकासाच्या दृष्टीकोनाचं प्रतिबिंब अर्थसंकल्पात दिसतं असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. त्यांनी सांगितलं….

**होल्ड - बाईट - एकनाथ शिंदे**

प्रादेशिक संतुलित विकासाला चालना देणारा हा अर्थसंकल्प असल्याचं उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या.

निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता या अर्थसंकल्पात केली नसल्याची टीका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना केली….

**होल्ड - बाईट - उद्धव ठाकरे**

या अर्थसंकल्पात शब्द आणि आकड्यांचा मारा करत धूळफेक केली आहे, अशी टीका काँग्रेसचे विधानसभेतले नेते विजय वडेट्टीवार यांनी केली….

***होल्ड- बाईट - विजय वडेट्टीवार***

हा अर्थसंकल्प महाराष्ट्राला दिवाळखोरीकडे घेऊन जाणारा आहे, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

**<><><><><>**

शेती हा देशाच्या विकासाच्या दीर्घकालीन प्रवासासाठी एक धोरणात्मक आधारस्तंभ असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज कृषी आणि ग्रामीण परिवर्तन या विषयावरच्या अर्थसंकल्पोत्तर वेबिनारला संबोधित करत होते. कृषी क्षेत्राला बळकटी देण्यासाठी सरकारने सातत्याने पावलं उचलली आहेत. यंदाचा अर्थसंकल्प शेती आणि

ग्रामीण परिवर्तनाला प्रोत्साहन देत असल्याचं मोदी म्हणाले. देशात सध्या अन्नधान्य, डाळी आणि तेलबियांचं विक्रमी उत्पादन होत असून निर्यातीवर लक्ष केंद्रित करून रसायनमुक्त शेती आणि नैसर्गिक शेतीवर भर देण्याची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली.

**<><><><><>**

अमेरिका आणि इस्राएलनं इराण विरोधात छेडलेल्या युद्धाचा आज सातवा दिवस. या युद्धात इराणची बहुतेक सर्व हवाई संरक्षण प्रणाली आणि क्षेपणास्त्र प्रक्षेपक आपण नष्ट केल्याचा दावा इस्रायली लष्करानं केला आहे, तर, अमेरिका तेहरानवरचे हल्ले आणखी तीव्र करणार असल्याचा इशारा अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी दिला आहे.

पश्चिम आशियामधला संघर्ष थांबवण्यासाठी जगानं तातडीनं पावलं उचलायला हवीत, असं संयुक्त राष्ट्रांचे मानवाधिकार उच्चायुक्त व्होल्कर तुर्क यांनी म्हटलं आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणी लष्कराला शस्त्र खाली ठेवण्याचं आवाहन केलं आहे. तर सध्याच्या या परिस्थितीला अमेरिका पूर्णपणे जबाबदार असल्याचं इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अरघची यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

अमेरिका आणि इस्रायल बरोबरच्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर काही देशांनी मध्यस्थीचे प्रयत्न सुरु केले असल्याचे इराणचे राष्ट्रपती मसुद पेझेश्कियन यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

अमेरिका-इस्रायल आणि इराण युद्धामुळे वाढलेला भू-राजकीय तणाव, कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींचा परिणाम आशियाई शेअर बाजारांवर झाला. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर १ हजार ९७ अंकांची घसरण झाली आणि तो ७८ हजार ९१९ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३१५ अंकांची घसरण नोंदवत २४ हजार ४५० अंकांवर बंद झाला.

**//<><><><><>//**